## कण्हेर

*Nerium oleander* L. Family – Apocynaceae



**विविध भाषांमधील नावे:**
English: पिंक रोझ हिंदी: कनेर, मराठी: कण्हेर, तामिळ: आराली, बंगाली: रक्तकराबी

Morphology:
*Nerium oleander* most commonly known as oleander or Nerium, is a shrub or small tree cultivated worldwide in temperate and subtropical areas as an ornamental and landscaping plant.

**वनस्पतीचे वर्णन:**
निसर्गात आपण पुष्कळ फुलझाडे पाहतो. त्यापैकीच एक फूलझाड म्हणजे कण्हेर होय. अगदी पूर्वी पासून ही फुले अस्तित्वात आहेत. फुलांचा रंग पांढरा, तांबडा, पिवळा, फिक्कट गुलाबी असतो.
प्रकार: फुलांच्या रंगाव रून १) पांढरी कण्हेरी २) पिवळी कण्हेरी ३) तांबडी कण्हेरी ४) कृष्ण किंवा कृष्णनिळी कण्हेरी असे चार प्रकार पडतात. कृष्णनिळी कण्हेरी हा प्रकार जास्त दिसत नाही. पिवळ्या कण्हेरीला व्यवहारात बिट्टी' असे म्हणतात.



**बहर येण्याचा कालावधी:** उन्हाळ्यात

**औषधी उपयोग:**
कण्हेरीची पाने,फुले व लहान सहान फांद्या तसेच मुळ्यासुद्धा औषधांसाठी उपयोगी पडतात. कण्हेरीच्या मुळ्या अत्यंतविषारी असल्याने या झाडांच्या जवळ साप येत नाहीत. पांढरी कण्हेरी तिखट, कडू, तुरटआहे, परंतु मूळव्याधवर आंधळेपणा अशा रोगांचा ती नाश करते. तसेच लाल –गुलाबी व पिवळ्या कण्हेरी मुळे कफ, ज्वर, कुष्ठ, कोड, कृमी, अंगावरचे फोड, मस्तक शूळ (डोकेदुखणे) यां वर उपाय करता येतो. साप चावला तर पांढऱ्या कण्हेरीचे मूळ गोमूत्रात उगाळून दंश झालेल्या ठिकाणी लावले तर रोगी बरा होतो. आयुर्वेदात विषमज्वरावरही कण्हेरी अतिशय गुणकारी आहे.

**लागवड-** फांद्यांपासून नवीन रोपे तयार केली जातात.